# तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावर पायाभूत सुविधा वाढविणे
## १०० टक्के राज्य पुरस्कृत योजना
## सन २०१४-१५ मध्ये राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना
## शासन निर्णयाच्या अधिन राहून

**प्रस्तावनाः-** राज्यात एकुण १९४ तालुका बीज गुणन केंद्र आहेत. सदर तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम घेऊन नव नवीन वाणांचे बियाणे उत्पादीत करण्यात येते. तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावर पायाभूत बियाणे उत्पादनासाठी पायाभूत सुविधांचे सहाय्य या योजनेअंतर्गत प्रक्षेत्रावर लहान बांधकामे, सामुग्री व पुरवठा आणि कार्यालयीन खर्च या बाबी इ. सुविधा निर्माण करुन प्रक्षेत्र कार्यक्षम करणे. तसेच शेती संलग्न पुरक कार्यक्रम जसे गांडूळ कल्चर, गांडूळ खत उत्पादन, जैविक नियंत्रणाचे घटक उत्पादीत करणे, नाडेप पध्दतीने कंपोष्ट खत तयार करणे, निम पावडर, निम आर्क उत्पादन करणे असे विविध उपक्रम घेऊन तालुका बीज गुणन प्रक्षेत्र अधिक कार्यक्षम करणे.

**योजनेचा उद्देश्य** :- उपरनिर्दीष्ट उपाययोजनांपैकी प्राथम्यक्रमानुसार व आवश्यकतेनुसार निवड करुन, तसेच प्रत्येक प्रक्षेत्रावरील कायमस्वरुपी तोटयाची, नफ़याची आणि कधी नफा कधी तोटयाची परिस्थिती विचारात घेऊन तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावर पायाभूत सुविधा वाढविणे या योजनेचा वर्ष २०१४-१५ साठी प्रत्येक तालुका बीज गुणन केंद्रांवर बिजोत्पादनाच्या पायाभुत सुविधांमध्ये वाढ होऊन, ती आर्थिक दृष्टया सक्षम होण्यास मदत होईल.

**आर्थिक तरतुदः-** अनुदानाचे वाटप आयुक्तालयाचे लेखा शाखेकडून बी.डी.एस. प्रणालीव्दारे विभागास जिल्हानिहाय वितरीत करण्यात येत आहे. **बाबवार निर्धारीत केलेल्या कार्यक्रमासाठी सक्षम अधिका-याची प्रशासकीय मान्यता व तांत्रीक मान्यतेनूसार मंजूरी आदेश निर्गमित झाल्यानंतरच बाबीवरील खर्च करण्यात यावा.**

**१) कार्यालयीन खर्च-**

**२) पुरवठा व सामुग्री :-** मंजूर पीक कार्यक्रम (कमी खर्चाचा/फायद्याचा) राबविण्यासाठी अत्यंत निकड असेल, अशा वेळेस अत्यल्प खर्च या योजनेतून करण्यात यावा. हा खर्च रु. १०,०००/- प्रति प्रक्षेत्र यापेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. यापेक्षा जास्त खर्च झाल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची पूर्व मान्यता जास्तीच्या खर्चास घ्यावी. अथवा मर्यादे पर्यंतच्या खर्चास पूरेसे समर्थन नसल्यास सदरची रक्कम वसूल पात्र राहील. ताबिके प्रक्षेत्रावर घेण्यात येणा-या कार्यक्रमातील निविष्ठा जसे बियाणे, खते औषधी इ. खरेदी करण्या करीता. त्याचप्रमाणे प्रक्षेत्रावर राबविण्यात येणारे पूरक कार्यक्रम जसे जैविक किड नियंत्रक उत्पादके, गांडूळ कल्चर/खत उत्पादन, निम पावडर / निमअर्क, निळे हिरवे शेवाळ उत्पादन, युरीया ब्रिकेट इत्यादी उपक्रमांसाठी वेळेवर निधी उपलब्ध झाल्यामुळे त्यांचे उत्पादन वेळीच घेता येईल. त्या हंगामामध्ये शक्य असेल तेथे त्याचा वापर करता येईल . विक्रीचे माध्यमातून प्रक्षेत्रावरील उत्पन्नात वाढ करता येईल. याशिवाय ज्या प्रक्षेत्रावर निश्‍चित अधिक नफा होईल अशा क्षेत्रावरील कार्यक्रमासाठी सुध्दा हा निधी वापरता येईल.

**३) लहान बांधकामे :-** लहान बांधकामे याबाबीखाली प्रक्षेत्रावरील उत्पादनात वाढ करण्यास सहाय्यभूत ठरणारी सिंचनाची कामे उपसा सिंचन , पाईप लाईन बसविणे, विहीर खोदणे, कूप नलिका घेणे, विहीर खोदाई तसेच प्रक्षेत्रावर गोडावून बांधकामे व प्रशिक्षण हॉलचे किरकोळ बांधकामे, कंपाऊंड वॉल इत्यादी बांधकामे प्राधान्याने घेण्यात यावीत. बियाणे उत्पादन करून आस्थापना व आस्थापना विरहित जे प्रक्षेत्र फायद्यात आहे अशा प्रक्षेत्रावर लहान बांधकामाचे आवश्यक ते कामे प्रथम प्राधान्याने घेण्यात यावी.

**सदरील निधी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी मंजुर केलेल्या अनुदानातुन खालील लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात यावा. तसेच सन २०१४-१५ मधील कार्यक्रमासाठीच वरील बाबनिहाय निधी वापरण्यात यावा.**

**लेखाशिर्ष मागणी क्रमांक डी-३**

**२४०१ पीक संवर्धन**
**१०३ बी बियाणे**
**(००)(२५) तालुका बिज गुणन प्रक्षेत्रावर पायाभूत सुविधा(राज्य योजना)**
**(२४०१ ९३६७)**
**१३ कार्यालयीन खर्च**
**२१ पुरवठा व सामुग्री**
**२७ लहान बांधकामे**

**सदर योजनेचा भौतिक व आर्थिक मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेस कृषि आयुक्तालयास सादर करण्यात यावा. तसेच विनीयोजन प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.**

**मा.संचालक (नि.व गुनि) यांचे मान्यतेने**

**स्वाक्षरीत/-**
कृषि संचालक (नि.व गुनि)
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे करीता

------------------00000000---------------

जा.क्र/गुनि१/२/ताबिके/मासु१४-१५/१६३/२०१४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र .राज्य पुणे
दिनांक : ०३/०६/२०१४

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक -------------------- (सर्व)
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ------------------(सर्व)

स्वाक्षरीत/-
**कृषि संचालक (नि.व गुनि)**
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे** करीता